## BOMBAY ACT No. XCVI OF 1

AN ACT TO MAKE TEMPORARY PROVISIONS FOR INDUSTRIAL RELATIONS AND OTHER MATTERS TO ENABLE THE STATE GOVERNMENT TO CONDUCT INDUSTRIAL UNDERTAKINGS AS A MEASURE OF UNEMPLOYMENT RELIEF.

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९६ वा.

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर " मुंबई राजपत्रांत " तारीख २ डिसेंबर १९५८ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]

### बेकारीचें निवारण करण्यासाठीं उपाययोजना म्हणून औद्योगिक उपक्रम चालविणें राज्य सरकारास शक्य व्हावें यासाठीं औद्योगिक संबंध व इतर बाबी यांविषयीं तात्पुरते उपबंध करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, बेकारीचें निवारण करण्यासाठीं उपाययोजना म्हणून औद्योगिक उपक्रम चालविणें राज्य सरकारास शक्य व्हावें यासाठीं औद्योगिक संबंध व इतर बाबी यांविषयीं तात्पुरते उपबंध करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी ह्याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

**लघु संज्ञा व व्याप्ति.**

१. (१) या अधिनियमास मुंबई (निवारण) उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८ असें म्हणावें.

(२) तो संबंध मुंबई राज्यास लागू असेल.

**व्याख्या.**

२. संदर्भावरून इतर अर्थ होत नसेल तर, या अधिनियमांतील,—

(१) " उद्योग " या संज्ञेचा अर्थ, मालकांचा कोणताहि धंदा, व्यापार, उपक्रम, माल तयार करण्याचा व्यवसाय किंवा धंदा असा समजावा व तींत, कामगारांचा कोणताहि व्यवसाय, सेवा, नोकरी, हस्तकौशल्य किंवा औद्योगिक व्यवसाय यांचा समावेश होतो ; आणि " औद्योगिक " या शब्दाचा अर्थ त्यानुसार लावला पाहिजे ;

(२) " निवारण उपक्रम " या संज्ञेचा अर्थ, कलम ३ अन्वयेंचा जाहीरनामा ज्याच्या संबंधांत अंमलांत असेल तो औद्योगिक उपक्रम असा समजावा.

**निवारण उपक्रम जाहीर करणें.**

३. (१) राज्य सरकारास जर कोणत्याहि वेळीं तसें करणें आवश्यक वाटेल तर त्यास राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें असें जाहीर करण्याचा अधिकार आहे कीं, उक्त अधिसूचनेंत निर्दिष्ट केलेला जो औद्योगिक उपक्रम—मग तो राज्य सरकारनें सुरू केलेला असो, संपादन केलेला असो किंवा इतर रीतीनें ताब्यांत घेतलेला असो—राज्य सरकार स्वतः किंवा आपल्या प्राधिकाराखालीं चालवीत असेल किंवा तो चालविण्याचें त्यानें योजिलें असेल तो उपक्रम, उक्त अधिसूचनेंत त्यासाठीं निर्दिष्ट केलेल्या तारखेपासून, बेकारीचें निवारण करण्यासाठीं उपाययोजना म्हणून तशा रीतीनें चालविण्यांत येईल ; आणि उक्त उपक्रम हा त्यानुसार, या अधिनियमाच्या प्रयोजनां-साठीं निवारण उपक्रम आहे असें समजलें पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वयेंची अधिसूचना, उक्त अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा बारा महिन्यांपेक्षां अधिक नसलेल्या मुदतीपर्यंत अंमलांत असेल ; परंतु अशा अधिसूचनेची मुदत तसल्या अधिसूचनाद्वारें, एकाव्या वेळीं सहा महिन्यांपेक्षां अधिक नाहीं इतक्या मुदतीपर्यंत वाढवितां येईल ; परंतु, एकूण मुदत दोन वर्षांपेक्षां अधिक होतां कामा नये.

निवारण उपक्रमासाठीं औद्योगिक संबंध व इतर सवलती तात्पुरत्या विहित करण्याचा अधिकार.

४. (१) कोणताहि विधि, रिवाज, रूढि, करार, लेख, हुकूमनामा, आदेश, निवाडा, विनंति अर्ज, तडजोड, स्थायी आदेश किंवा इतर कोणताहि उपबंध असला तरीहि, राज्य सरकारला राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें पुढील निदेश देण्याचा अधिकार आहे :—

(अ) कोणत्याहि निवारण उपक्रमासंबंधीं व ज्या मुदतीपर्यंत तो निवारण उपक्रम कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वयें निवारण उपक्रम म्हणून चालू राहील त्या मुदतीच्या बाबतींत,—

(१) ह्या अधिनियमाच्या अनुसूचींतील सर्व किंवा त्यांपैकीं कोणतेहि विधि किंवा त्यांचे कोणतेहि उपबंध लागू असणार नाहींत (आणि असा निवारण उपक्रम त्यांमधून वगळण्यांत येईल), किंवा राज्य सरकारनें तसा निदेश दिल्यास, ते अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा फेरफारांसह (तथापि त्यामुळें उक्त विधीच्या धोरणास बाध येणार नाहीं) लागू होतील ;

(२) ह्या अधिनियमाच्या अनुसूचींतील विधींपैकीं कोणत्याहि विधीन्वयें केलेले जे करार, तडजोडी, निवाडे किंवा स्थायी आदेश तो उपक्रम सरकारनें निवारण उपक्रम म्हणून संपादन करण्याच्या किंवा आपल्या ताब्यांत घेण्याच्या लगतपूर्वी त्या उपक्रमास लागू असतील ते सर्व किंवा त्यांपैकीं कोणतेहि करार, तडजोडी, निवाडे किंवा स्थायी आदेश यांचा अंमल स्थगित करण्यांत येईल, किंवा राज्य सरकारनें तसा निदेश दिल्यास, अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा फेरफारांसह लागू होतील ;

(३) हक्क, विशेषाधिकार, बंधनें व जबाबदाऱ्या कंडिका (१) व (२) आणि अधिसूचना यांस अनुसरून ठरविण्यांत येतील व अंमलांत आणतां येतील.

(४) तो उपक्रम हा निवारण उपक्रम म्हणून जाहीर करण्यापूर्वी प्राप्त झालेला हक्क, विशेषाधिकार, किंवा बंधन किंवा पत्करलेली जबाबदारी व त्यांच्या अंमलबजावणीसाठींची कोणतीहि उपाययोजना स्थगित करण्यांत येईल आणि कोणतेंहि न्यायालय, न्यायाधिकरण, अधिकारी किंवा प्राधिकारी यांजपुढें अनिर्णित राहिलेलें त्यासंबंधींचें कोणतेंहि कामकाज स्थगित करण्यांत येईल ;

(ब) कंडिका (अ) (४) मध्यें उल्लेखिलेला हक्क, विशेषाधिकार, बंधन किंवा जबाबदारी अधिसूचनेचा अंमल बंद झाल्यावर पुन्हां अस्तित्वांत येईल व अंमलांत आणतां येईल आणि त्यांत उल्लेखिलेलें कामकाज चालू ठेवण्यांत येईल :

परंतु, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधींत कांहींहि असलें तरी असा हक्क, विशेषाधिकार, बंधन किंवा जबाबदारी यांच्या अंमलबजावणीसाठीं मुदत मोजतांना, ज्या कालावधींत कंडिका (अ) (४) अन्वयें ती स्थगित करण्यांत आलेली होती तो कालावधि वगळण्यांत येईल.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचना तींत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा तारखेपासून अंमलांत येईल, अशी तारीख कलम ३, पोट-कलम (१) मध्यें उल्लेखिलेल्या तारखेच्या आधींची असणार नाहीं, आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (सन १९०४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १) याच्या कलम २१ चे उपबंध अशी अधिसूचना काढण्याच्या अधिकारास लागू असतील.

## अनुसूचि.

### केंद्रीय अधिनियम.

१. औद्योगिक नोकरी (स्थायी आदेश) अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा अधिनियम २० वा).

२. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा अधिनियम १४ वा).

### मुंबई अधिनियम.

३. मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ (सन १९४७ चा मुंबई अधिनियम ११ वा).

४. मुंबई दुकानें व संस्था अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई अधिनियम ७९ वा).

### मध्य प्रदेश अधिनियम.

५. मध्यप्रांत व वऱ्हाड दुकानें व संस्था अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम २२ वा).

६. मध्यप्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद तोडजोड अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम २३ वा).

### सौराष्ट्र अधिनियम.

७. सौराष्ट्र व दुकानें व संस्था अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा सौराष्ट्र अधिनियम १० वा).

### हैदराबाद अधिनियम.

८. हैदराबाद दुकानें व संस्था अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा हैदराबाद अधिनियम १० वा).

(True translation)

Y. H. PITKE,

Examiner of Books and Publications, Bombay.

## BOMBAY ACT No. XCVII OF 1958.

## THE BOMBAY SEPARATION OF JUDICIAL AND EXECUTIVE FUNCTIONS (EXTENSIONS) AND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE (PROVISION FOR UNIFORMITY) ACT, 1958.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति तारीख १ डिसेंबर १९५८ रोजीं मिळालेली असल्यानें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.